नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ४२ Issue - 42 | वार - सोमवार दि. ६ जुलै २०२६ Blow- Monday Date 6 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सिद्धगंगा हॉटेल मालक पोमाजी यांनी केले स्वयंपाकी महिलाचे खून; पाच तासात आरोपी जेरबंद

## अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणेकडील पोलीसांची उल्लेखनीय कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे हदिदतील वागदरी दुरक्षेत्रातील वागदरी गावाच्या शिवारात इसम नामे हचप्पा चौडप्पा कोले रा. वागदरी यांचे शेतातील पडक्या विहरीजवळ एक अंदाने ३५ ते ४० वर्षे वयाचे स्त्री जातीचे प्रेत पडल्याची बातमी मिळाल्याने लागलीच पोनि/ अविनाश पवार, सपोनि / पन्हाळकर, वागदरी दुरक्षेत्राचे अंमलदार व गुन्हे प्रकटीकरणाचे अंमलदार तात्काळ घटनास्थळ रवाना झाले.





पोनि/अविनाश पवार व पोलीस स्टाफ असे सदर घटनास्थळी पोलीस अंमलदार यांनी भेट दिली असता सदर महिलेच्या गळयाजवळ व्रण होते. तिचे आजबाजुस काहिएक चिजवस्तु नव्हती. प्रथमदर्शनी सदर महिलेस कोणीतरी गळा दाबुन खुन करून पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने तेथे फेकुन दिल्याचे दिसत होते. सदर महिलेच्च्या मृतदेहाजवळ आेळख पटण्यासारखी काहिएक चीज वरत नसल्याने तिचे आेळख पटविणे खुप आव्हानात्मक काम होते. त्याकरीता सदर अनोळखी महिलेचे नाव निष्पन्न करण्याकरीता फोटो काढुन वागदरी व आजु बाजुच्या गावातील सोशल मिडीया ग्रुपवर व्हायरल केले असता सदर महिला हि वागदरी गावातील असुन तिचे नाव लक्ष्मीबाई भालचंद्र जाधव वय ५१ वर्षे, रा. वागदरी, ता. अक्कलकोट असे असल्याचे समजले. सदर महिलेबाबत गावात चौकशी करीत असताना आम्हाला गोपनीय बातमीदारांमार्फत मिळाली की, सदर महिला हि परमेश्वर सिध्दाराम पोमाजी रा. वागदरी, ता. अक्कलकोट याचे हॉटेल सिध्दगंगा मध्ये सुमारे ०३ वर्षापासुन कामास होती. तेथे कामावर गेल्यावर थोड्या दिवसांत हॉटेलचे मालक परमेश्वर पोमाजी याचेसोबत अनैतिक संबंध सुरू होते. सदर इसम परमेश्वर पोमाजी याचे दिड वर्षापुर्वी लग्न झाले होते. परमेश्वर पोमाजी याचे लग्न झालेपासुन त्यांचे दोघांत सतत भांडण होत होते. सदर भांडणात परमेश्वर पोमाजी यांगी लक्ष्मीबाई जाधव यांना जिवे मारण्याची धमकी दिली होती. अशी माहिती मिळाल्याने लागलीच पोलीस पथकातील अंमलदार यांनी परमेश्वर पोमाजी याची माहिती घेतली असता तो त्याचे घरी असल्याची माहिती मिळाल्याने लागलीच त्याचे घरी गेले असता तो पळून जाण्याच्या तयारी असताना पोलीस पथकांनी त्यास ताब्यात घेवुन परमेश्वर पोमाजी याचेकडे सदर महिलेल्या मयताच्या अनुषंगाने कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने सततच्या होणा-या भांडणला वैतागुन लक्ष्मीबाई जाधव हिचा गळा दाबुन खुन करून जिवे ठार मारून तिचा प्रेत हुत्तप्पा चौडप्पा कोले रा. वागदरी यांचे शेतातील पडक्या विहरीच्या कडेला टाकल्याचे सांगितले आहे.




सदर महिलेचा गळा दाबुन खुन केला म्हणुन अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणेस गुरनं. ४०२/२०२६ बी. एन. एस. कलम १०३(१), २३८, ३५१ (३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास सपोनि / अमोल पन्हाळकर हे करीत असुन सदर गुन्हयात परेमश्वर सिध्दाराम पोमाजी रा. वागदरी, ता. अक्कलकोट यांस अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधिक्षक श्री. अतुल कुलकर्णी, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. विजय कबाडे, श्री. राजेंद्र टाकणे उपविभागीय पोलीस अधिकारी, अक्कलकोट यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. अविनाश पवार यांचे नेतृत्वाखाली सपोनि / अमोल पन्हाळकर, पोहेकॉ संजय पांढरे, पोहेकॉ/लक्षमण कांबळे, पोहेकों / गणेश अंगुले, पोहेका / महेश कोळी, मपोहेकों / ज्योती मोरे, पोकों/महादेव शिंदे, पोकों/गोविंद राठोड, पोकों/केदार सुतार, पोकों/श्रीकांत जवळगे, पोकों/महांतेश मुळजे, पोकों/विजय महानुर, पोकों/विकास पवार, पोकों/पैगंबर मुलाणी यांचे पथकाने कामगिरी बजावली आहे.

# मुसळधार पावसासह सोसाट्याचा वारा वाहणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईस ठाणे, पालघर, कल्याण डोंबिवली तसेच कोकणात सध्या मुसळधार पाऊस सुरु आहे. अनेक ठिकाणी पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. तर काही ठिकाणी नद्यांना पूर देखील आले आहे. दरम्यान, मुंबईत पावसाची संततधार सुरुच आहे. अशातच सरकारनं एक मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईतील सर्व शासकीय, खासगी, महानगरपालिका शाळा व महाविद्यालयांना सोमवार म्हणजे उद्या दिनांक ६ जुलै २०२६ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मुंबईसह ठाणे जिल्ह्यात देखील शाळा महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. त्याचबरोबर कल्याण डोंबिवली, बदलापूरमध्ये देखील शाळा महाविद्यालयांना उद्या सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.




भारतीय हवामान विभागाने मुंबई महानगराला उद्या सोमवार, दिनांक ६ जुलै २०२६ रोजी मुसळधार पावसाचा तसेच सोसाट्याचे वारे वाहतील असा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता मुंबईतील शासकीय, खासगी, महानगरपालिका शाळा व महाविद्यालयांना उद्या, दिनांक ६ जुलै २०२६ रोजी सुटी जाहीर करण्यात येत आहे. मात्र, शासकीय व खासगी कार्यालये नियमितपणे सुरू राहतील. आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे, असेदेखील आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पालघर आणि रायगड जिल्ह्यात देखील शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर

मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर पालघर आणि रायगड जिल्हा प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. या दोन्ही जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सोमवारी (६ जुलै) अधिकृत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सोमवारी रायगड, नाशिक, पुण्यासह सातारा घाटमाथा परिसरासाठी 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे, तर मुंबई आणि ठाण्यासह इतर किनारी जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. विशेषतः रायगड जिल्ह्यात पुढील दोन दिवस अतिमुसळधार पावसाचा हाय अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये आणि लहान मुलांचे हाल होऊ नयेत, यासाठी जिल्हा प्रशासनाने तात्काळ खबरदारीचे पाऊल उचलले आहे.

शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली असली, तरी प्रशासकीय यंत्रणा मात्र पूर्णपणे सतर्क मोडवर आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार, या सुट्टीच्या कालावधीत सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत किंवा कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक आहे. स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार या सर्व कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाच्या कामात मदत करावी लागणार आहे.

## ३ तासांच्या बचाव मोहिमेनंतर सर्वांची सुखरूप सुटका

# खोपोलीच्या झेनिथ धबधब्यावर १०० हून अधिक पर्यटक अडकले;

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रायगड : पावसाळी पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या खोपोलीतील झेनिथ धबधब्यावर शनिवारी मोठी दुर्घटना टळली. मुसळधार पावसामुळे अचानक ओढ्याला पूर आल्याने १०० हून अधिक पर्यटक अडकून पडले. सुमारे २ ते ३ तास चाललेल्या बचाव मोहिमेनंतर सर्व पर्यटकांची सुखरूप सुटका करण्यात आली.

रायगड जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असून हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला आहे. तरीही वीकेंड असल्याने अनेक पर्यटक झेनिथ धबधब्यावर फिरण्यासाठी आले होते. धबधब्यात आनंद घेतल्यानंतर परतत असताना अचानक ओढ्याच्या पाण्याची पातळी वेगाने वाढली. जोरदार प्रवाहामुळे पर्यटकांना ओढा ओलांडता आला नाही आणि ते एका बाजूला अडकून पडले.

घटनेची माहिती मिळताच विहारी ठाकुरवाडी येथील ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी दोरखंडाच्या सहाय्याने मानव साखळी तयार करून अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यास सुरुवात केली. दरम्यान, या घटनेची माहिती खोपोली पोलिसांना आणि खोपोली नगर परिषदेच्या अग्निशमन दलालाही देण्यात आली. माहिती मिळताच बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली आणि ग्रामस्थांच्या मदतीने बचावकार्य अधिक वेगाने सुरू करण्यात आले. दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास सुरू झालेली ही मोहीम जवळपास ३ तास चालली. अखेर सर्व पर्यटकांची कोणतीही जीवितहानी न होता सुखरूप सुटका करण्यात यश आले. दरम्यान, प्रशासनाने मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर धबधबे, नद्या आणि ओढ्यांच्या परिसरात जाणे टाळावे, तसेच हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पर्यटकांना केले आहे.



दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### पावसाचा कहर

राज्यात गेल्या काही दिवसापासून पावासाची तुफान बॅटिंग सुरु आहे. अशातच मुंबईसह उपनगरात मात्र मुसळधार पावसाचा रुद्ररुप बघायला मिळालं आहे. मुंबई आणि परिसराला रविवारी, सलग दुसऱ्या दिवशी, मुसळधार पावसाने झोडपून काढले. त्याचबरोबर पावसात झाडे कोसळण्याच्या घटनांचं सत्र सुरूच असून कुर्ला आणि गोरेगाव येथे दोघांचा झाडांच्या फांद्या कोसळून मृत्यू झाला. तर नवी मुंबई आणि पनवेल येथे अतिवृष्टीशी संबंधित घटनांमध्ये चार जण ठार झाले. अशातच आज सोमवारी देखील पावसाचा कहर कायम राहणार असून हवामान विभागाने राज्यातील अनेक जिल्ह्यांना खबरदारीचा इशारा दिला आहे. मुंबईप्रमाणेच कोकणात देखील मुसळधार पावसाचा कहर बघायला मिळत आहे. अशातच प्रादेशिक हवामान विभागानं पालघर, ठाणे, मुंबई, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला. या जिल्ह्यांसाठी 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे. परिणामी, कोकण विभागात पावसाचा सर्वाधिक प्रभाव कायम राहणार असल्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीची शक्यता असल्याने रेड अलर्टचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वर्धा, यवतमाळ आणि वाशिम या जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे.

## स्वेरीतील स्क्रूटिनी सेंटरचा विद्यार्थ्यांना हमखास फायदा होणार : प्राचार्य डॉ. यु.आर.मुंडे




**स्वेरीमध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया केंद्राचे थाटात उदघाटन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'स्वेरीच्या वतीने व पालकांच्या मागणीनुसार उघडलेल्या या कॅप रजिस्ट्रेशन केंद्राचा बारावी उत्तीर्ण झालेल्या व उच्च शिक्षणाच्या प्रतिक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांना १०० टक्के फायदा होणार आहे याचा मला विश्वास आहे. मी स्वेरीचे व डॉ. बी.पी. रोंगे सरांचे नाव खूप ऐकून आहे. तंत्रशिक्षण क्षेत्रात वेगवेगळे उपक्रम सातत्याने व यशस्वीपणे करत असताना अनेक विद्यार्थ्यांना या उपक्रमांचा फायदा झाला आहे. स्वेरीमध्ये शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आपल्या करिअर मध्ये यशस्वी झालेले आहेत. राज्यातील अनेक विद्यार्थी स्वेरीत प्रवेश घेण्यासाठी उत्सुक असतात हे चित्र नेहमी पहायला मिळते. डॉ. रोंगे सरांचे व स्वेरीचे कार्य अभिमानास्पद व गौरवास्पद आहे. या सर्व कारणांमुळे स्वेरीतील कॅप रजिस्ट्रेशन केंद्र विद्यार्थ्यांना फायदेशीर ठरेल.' असे प्रतिपादन पंढरपूरच्या विवेकवर्धिनी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. यु.आर.मुंडे यांनी केले.

'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व पालकांना अभियांत्रिकी प्रवेशासाठी कोणतीही द्विधा स्थिती होऊ नये, अडचण येवू नये, योग्य दिशा आणि अचूक माहिती मिळून योग्य पद्धतीने रजिस्ट्रेशन करता यावे. यासाठी स्वेरीमध्ये 'कॅप रजिस्ट्रेशन केंद्रा'चे अर्थात 'स्क्रूटनी सेंटर'चे नुकतेच उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. यु.आर.मुंडे बोलत होते. प्रास्ताविकात अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.उत्तम अनुसे म्हणाले की, 'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी डॉ. बी.पी. रोंगे सरांनी १९९८ साली अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली. पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांची चांगल्या कंपनीत अथवा प्रशासकीय क्षेत्रात कशी निवड होईल व उत्तम करिअर कसं घडेल या दृष्टीने सातत्याने प्रयत्न होत आहेत. प्रयत्नांना यश मिळाल्यामुळे साहजिकच प्रत्येक वर्षी स्वेरीच्या यशाचा आलेख देखील उंचावत आहे. या केंद्रात उच्चशिक्षित व अनुभवी प्राध्यापक वर्गाची टीम सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत रजिस्ट्रेशन करण्यासाठी सज्ज आहे. स्वेरी संचलित अभियांत्रिकी (पदवी) महाविद्यालयात प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यापासून ते प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे, त्यांची पडताळणी, शैक्षणिक पात्रता, प्रवेश घेताना तसेच महाविद्यालयांची निवड करताना विद्यार्थ्यांनी करिअरचा विचार करून नेमक्या कोणकोणत्या महत्वाच्या बाबी पहाव्यात याबाबत माहिती देण्यात येत आहे. त्यानंतर कॅप राउंडस्, कॅम्पस प्लेसमेंट, ब्रँचची निवड, मागील वर्षातील विविध विभागांचे कट ऑफ मार्क्स या व इतर संबंधित गोष्टींबाबत विद्यार्थी व पालक यांना योग्य व खात्रीशीर मार्गदर्शन मिळत आहे. तसेच रजिस्ट्रेशन केल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपला आयडी व पासवर्ड कोणालाही शेअर करू नये याची आवर्जून काळजी घ्यावी.' अभियांत्रिकीच्या रजिस्ट्रेशन संदर्भात अधिक माहितीसाठी अधिष्ठाता प्रा. उत्तम अनुसे (मोबाईल क्र.- ९१६८६५५३६५) व प्रा. पोपट आसबे (७८२१००४६४७) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. या उदघाटन प्रसंगी डिप्लोमाचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, डॉ.डी. एस. चौधरी, तज्ञ प्राध्यापक वर्ग,पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

**'विद्यार्थी व पालकांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया करत असताना गोंधळ उडू नये व प्रवेशाची ही प्रक्रिया अचूकपणे व्हावी तसेच करिअरच्या दृष्टीने एक ठोस निर्णय घेता यावा यासाठी या कक्षाची निर्मिती केली आहे. एकूणच बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वपूर्ण असलेला हा कक्ष विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना नक्कीच फायदेशीर ठरेल.**

**– प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे**

## राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : केरळ व तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर व त्यांच्या पत्नी अनघा आर्लेकर यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांचा सपत्नीक शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी ,मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके तसेच मान्यवर उपस्थित होते.

तत्पूर्वी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची पाहणी करुन माहिती घेतली. यावेळी मंदिर समितीचे सहा अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत करण्यात आलेल्या व करण्यात येणाऱ्या कामांची माहिती दिली.

## महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या वतीने दादाराव वैरागे यांचा सत्कार करून दिला निरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



उमरगा/प्रतिनिधी : उमरगा महावितरण विभागातील तुरोरी उपकेंद्राचे प्रधान यंत्रचालक दादाराव वैरागे यांची नुकतीच अन्यत्र बदली झाली आहे. या निमित्ताने महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या वतीने त्यांचा भावपूर्ण सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला.

दादाराव वैरागे यांनी आपल्या कार्यकाळात अत्यंत उत्कृष्ट आणि उल्लेखनीय सेवा दिली आहे. उमरगा उपविभागांतर्गत येणाऱ्या बलसूर आणि तुरोरी येथील महावितरणच्या उपकेंद्रांमध्ये त्यांनी आपले कर्तव्य अत्यंत कार्यक्षमतेने बजावले. त्यांच्या याच उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत, उमरगा विभागातून बदली होत असताना कामगार संघटनेच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

या सत्कार व निरोप समारंभाप्रसंगी महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे लातूर झोन अध्यक्ष सुनील बडे, मंडळ अध्यक्ष शाम आबाचने, सहसचिव विनोद कुंभार, तुळजापूर विभागीय अध्यक्ष अमोल पाटील, सचिव मोहन गुरव, खंडाजी बंडगर, सुरज सुगरे, महमद लदाफ, देविदास कांबळे, महादेव बनसोडे आणि संदीप पवार यांच्यासह महासंघाचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मानखुर्दमध्ये चाळीचा भाग कोसळला, पाच जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईत सतत पडत असलेल्या पावसामुळे मानखुर्दमध्ये एक मोठी दुर्घटना झाली आहे. मुंबईच्या पूर्व उपनगरांतील मानखुर्दच्या जनता नगरमध्ये हनुमान मंदिराजवळ ही दुर्घटना झाली. चाळ क्रमांक पाचचा काही भाग सततच्या पावसामुळे कोसळला. मानखुर्दमध्ये झालेल्या या दुर्घटनेत किमान पाच जण ढिगाऱ्यात अडकले असल्याची भीती व्यक्त होत आहे. घटनास्थळी मुंबई महापालिका, पोलीस आणि अग्निशमन दल मदतकार्यात गुंतले आहे. १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकाही पोहोचल्या आहेत. अद्याप कोणी जखमी किंवा मृत असल्याचे वृत्त आलेले नाही. मदतकार्य वेगाने सुरू आहे. पडझड झाल्यामुळे कोसळलेला चाळीचा ढिगारा उपसण्याचे काम सुरू आहे. तळमजला अधिक तीन मजले अशा स्वरुपाची चाळ होती. या चाळीचा काही भाग कोसळला आहे. दुर्घटना होण्यामागचे नेमके कारण जाणून घेण्यासाठी मदतकार्य पूर्ण होताच तज्ज्ञांचे पथक चौकशी करणार आहे.

## श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात 'सार्थ श्रीज्ञानेश्वरी' ग्रंथाचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : संत साहित्याचा अमूल्य वारसा सर्वसामान्य वाचकांपर्यंत सुलभ भाषेत पोहोचविण्याच्या उद्देशाने संत वाङ्मयाचे अभ्यासक व लेखक लक्ष्मण सूर्यभान घुगे यांनी संपादित केलेल्या 'सार्थ श्रीज्ञानेश्वरी' या ग्रंथाचा भव्य प्रकाशन सोहळा संकष्टी चतुर्थीच्या पावन व मंगलमय मुहूर्तावर श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर, पुणे येथे भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या ग्रंथाचे प्रकाशन श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त सुनील रासने यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध आनंदी वास्तू तज्ज्ञ आनंद पिंपळकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून विश्वशांती दिंडी (आळंदी ते श्रीक्षेत्र पंढरपूर) च्या संस्थापक अध्यक्षा ह.भ.प. उषा विश्वनाथ कराड आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन (घुमान) चे अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. सदानंद मोरे, माईर्स एमआयटीचे प्रो. उप-कुलगुरू प्रा. डॉ. मिलिंद पांडे उपस्थित होते. तसेच सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, लेखक लक्ष्मण घुगे आणि इतर मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांचा आजच्या काळातील संदर्भ अधोरेखित करत 'ज्ञानेश्वरी' या कालजयी ग्रंथाचे आध्यात्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व विशद केले. संत साहित्य हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम असून, त्याचा आशय सर्वसामान्यांपर्यंत सहजतेने पोहोचणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. संपादक लक्ष्मण सूर्यभान घुगे यांनी सादर केलेली 'सार्थ श्रीज्ञानेश्वरी' ही आवृत्ती सुलभ, सोपी आणि समकालीन भाषाशैलीत असल्याने विद्यार्थी, अभ्यासक, वारकरी तसेच सर्वसामान्य वाचकांना ज्ञानेश्वरीचा गूढार्थ समजून घेण्यास मोलाची मदत होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. हा ग्रंथ संत साहित्याशी नव्या पिढीची अधिक जवळीक निर्माण करून अध्यात्म, संस्कार आणि जीवनमूल्यांचा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचविणारा ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

### एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातर्फे पुनर्जीवित नदी 'बद्दह' पुस्तकाचे प्रकाशन

## नदी ही जीवन, संस्कृती आणि सभ्यतेचा आधार आहे : डॉ. राजेंद्र सिंह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : नदी म्हणजे केवळ पाणी वाहणारा कालवा नव्हे, तर ती संस्कृती आणि निसर्ग यांना जोडणारा प्रवाह असून जीवन, संस्कृती आणि सभ्यतेचा आधार आहे. नद्या कोरड्या पडल्या, तर त्यासोबत संस्कृती आणि सभ्यतेचाही ऱ्हास होतो. असे प्रतिपादन जलतज्ञ ज्येष्ठ जलसंवर्धनतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांनी केले. पुण्यातील छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) प्रेक्षागृह येथे 'एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या वतीने आयोजित पुनर्जीवित नदी 'बद्दह' या त्यांच्या हिंदी व रिटा रॉड्रिग्स यांनी अनुवादित केलेल्या मराठी आवृत्तीचा प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे जेष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे व जेष्ठ समाजसेवक जयाजी पाईकराव यांच्या हस्ते आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्याध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे व संस्थापक कुलगुरू प्रा. डॉ. गोपालकृष्ण जोशी यांच्या उपस्थितीत या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. माईर्स एम आयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या शुभ आशीर्वादाने हा सोहळा पार पडला. यावेळी संचालक - स्ट्रॅटेजी अँड ऑपरेशन्स राघवेंद्र एम. चाटे, प्रोजेक्ट डायरेक्टर प्रा. प्रभा कासलीवाल, कुलसचिव प्राणेश मुरनाळ यांच्यासह शैक्षणिक, सामाजिक, उद्योग क्षेत्रातील तसेच जलसंवर्धन व पर्यावरण तज्ञ उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. सिंह म्हणाले पुणे हे संस्कृती, शिक्षण आणि विचारांचे शहर आहे. मात्र, या शहरातून वाहणाऱ्या नद्यांची अवस्था चिंताजनक आहे. नद्यांचे स्वरूप बदलणे हे त्या भागातील संस्कृतीचा ह्रास होण्याचे लक्षण आहे. सध्याच्या काळात नद्यांना पुन्हा जीवित करण्याची गरज आहे आणि जलसंपत्तीचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे याप्रसंगी बोलताना म्हणाले, पर्यावरण संरक्षण केवळ धोरणांमधून किंवा आंतरराष्ट्रीय करारांमधून साध्य होणार नाही. हा बदल विद्यापीठे, तरुणाई आणि समाजाच्या सक्रिय सहभागातूनच घडेल. जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकास हे परस्परांशी जोडलेले विषय असून शिक्षण, संशोधन आणि समाजाभिमुख उपक्रमांचा समन्वय ही काळाची गरज आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या शाश्वत विकास, पर्यावरणीय जबाबदारी, जलसंवर्धन आणि सामाजिक सहभाग या मूल्यांवर आधारित विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. स्वाती कराड चाटे म्हणाल्या, विद्यार्थ्यांना केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच पर्यावरण-जागरूक आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील नागरिक म्हणून घडविणे हे विद्यापीठाचे ध्येय आहे. पुनर्जीवित नदी 'बद्दह' हे पुस्तक जलसंवर्धनाच्या विचारांना समाजात नवी दिशा देणारे, लोकसहभागाला प्रेरणा देणारे आणि नव्या पिढीसाठी मार्गदर्शक संदर्भग्रंथ ठरेल. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपालकृष्ण जोशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या वतीने डॉ. राजेंद्र सिंह यांच्या पुनर्जीवित नदी 'बद्दह' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यामागची भूमिका स्पष्ट केली. जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षण हे विषय केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित राहू नयेत, तर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष कृतीत उतरावेत, या उद्देशाने एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाने या पुस्तकाच्या प्रकाशनाचा पुढाकार घेतला आहे, असे त्यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. प्रभा कासलीवाल यांनी केले.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ‘स्वच्छ पंढरपूर, स्वच्छ वारी, आनंदी वारी’... चंद्रभागा वाळवंट स्वच्छतेसाठी विशेष मोहीम, ५० स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती : पालकमंत्री जयकुमार गोरे

## उजनी धरणातून चंद्रभागा नदीपात्रात वारीच्या तीन दिवस अगोदर पाणी येणार, वारीपूर्वी वाळवंटाची झालेली स्वच्छता पाहून पालकमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी वारी २०२६ च्या पार्श्वभूमीवर चंद्रभागा नदीपात्र व वाळवंटाची स्वच्छता करण्याची विशेष मोहीम प्रशासनाने हाती घेतली आहे. नदीपात्राच्या दोन्ही बाजूला असलेली झुडपे, राडारोडा व कचरा पूर्णपणे काढून सपाटीकरण करावे, नदीकाठाच्या दोन्ही बाजूंची स्वच्छता करावी. तसेच वारीपरी संपूर्ण वाळवंट स्वच्छ करण्याबरोबरच संपूर्ण यात्रा कालावधीत व त्यानंतरही वाळवंटात भाविकांची गर्दी असेपर्यंत स्वच्छता मोहीम सुरू ठेवावी, अशा सूचना ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री मंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

**स्वच्छतेसाठी स्वतंत्र यंत्रणा**

नदीपात्रात प्लास्टिक व इतर कचरा गोळा करण्यासाठी मोठ्या कचरा कुंड्यांची व्यवस्था करावी, तसेच वाळवंटाच्या सफाईसाठी स्वतंत्र ५० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. वाळवंटाच्या प्रत्येक भागात



पाच कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून वाळवंट कायम स्वच्छ राहील, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. स्वच्छता कर्मचाऱ्यांना विविध भाग वाटून देण्यात आले असून, सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. सध्या सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून चंद्रभागा नदीपात्रा- तील वाळवंटाची स्वच्छता करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त सफाई कर्मचारीही या मोहिमेत सहभागी झाले आहेत. वारीपूर्वी वाळवंटाची झालेली स्वच्छता पाहून पालकमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले.

तसेच लाखो भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. त्यावेळी ते चंद्रभागेत पवित्र स्नान करण्यासाठी येतात. स्वच्छ वाळवंट पाहून त्यांना आनंदाने स्नान करता येईल. ‘स्वच्छ पंढरपूर, स्वच्छ वारी, आनंदी वारी’ ही संकल्पना राबविण्यात येत आहे, असे पालकमंत्री गोरे म्हणाले. तसेच आषाढी वारीसाठी उजनी धरणातून पाणी सोडण्याची कार्यवाही सुरू असून वारी पूर्वी तीन दिवस अगोदर चंद्रभागा नदी पात्रात पाणी पोहोचेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**आषाढीला ३०ते ३२ लाख भाविकांची शक्यता**

यंदाच्या संपूर्ण आषाढी वारी कालावधीत ३० ते ३२ लाख भाविक-वारकरी येण्याची शक्यता आहे. आषाढी यात्रा सोहळा सुखकर व निर्विघ्नपणे पार पाडावा, अशी प्रशासनाची भूमिका आहे. वारी कालावधीत वारकऱ्यांना रहदारीचा त्रास होऊ नये, यासाठी पंढरपूर शहरातील अतिक्रमणे काढण्यात प्रशासनाला यश आले असून, ही अतिक्रमणविरोधी मोहीम सुरूच रा- हणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पंढरपूर शहर व परिसर अतिक्रमणम ुक्त करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

वाळवंटात वारकरी भाविकांसाठी चेंजिंग रूम, हिरकणी कक्ष, तात्पु रती मुबलक शौचालये व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था मोठ्या प्रमाणात उपलब्ध करण्यात येणार आहे. वारकऱ्यांच्या सुविधेसाठी नवीन दर्शन मंडपाचे काम सुरू असून, यंदाच्या आषाढी वारीत येणाऱ्या भाविकांसाठी जनक महाराज अपर्शिंगेकर यांच्या खासगी म ालकीच्या जागेत मंदिर समितीकडून नव्याने दर्शन रांगेसाठी शेडची उभारणी करण्यात आली आहे. पालकमंत्री श्री. गोरे यांनी या ठिकाणची पाहणी करून दर्शन रांगेतील भाविकांसाठी सुलभ शौचालय, वैद्यकीय सुविधा, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आदी आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात, अशा सूचना दिल्या.

यावेळी आमदार समाधान आव- ताडे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उप विभागीय अधिकारी सचिन इथ- ापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहआयुक्त नगरपालिका प्रशासन आशिष शेलार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निमकर, मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

# उजनी धरणातून पाणी येणार आहे, शेतकऱ्यांमध्ये समाधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : जून महिन्यात मनावा तसा पाऊस पडला नसल्याने उजनी धरणातील पाणीसाठ्यात अपेक्षित वाढ झाली नव्हती. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते मात्र गेल्या काही दिवसापा- सून भीमा व निरा खोऱ्यात दमदार पाऊस झाल्याने उजनी धरणा त दौंड पंढरपूर सुमारे ६,८०० क्युसेस पाण्याचा विसर्ग येऊ लागला आहे त्यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

गेल्या वर्षी मे महिन्यापासून पाण्याच्या सुरुवात झाली होती त्यामुळे जुलै महिन्यात उजनी धरणात सुमारे ७४ टक्के पाणीसाठा होता मात्र यंदाच्या वर्षी अपेक्षित पाहून न झाल्याने जुलै महिन्यात उजनी धरणात सत्तावीस टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये गरम मसाला दिवसापासून भीमा व निरा खोऱ्यात दमदार पाऊस पडला असल्याने उजनी धरणा त वरच्या प्रवाहातील १९ धरणातील पाणीसाठ्यात वाढ होऊ लागली आहे. तसेच भीमा




खोऱ्यात झालेल्या पावसामुळे दौंड येथून उजनी धरणाकडे सुमारे ६.८०० क्युसेस पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे उजनी धरणात पाण्याची आवक सुरू असल्याने आगामी काळात धरणाच्या पाणी साठ्यात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वाता- वरण निर्माण झाले आहे.

# श्री माणकेश्वर वाचनालयाचा १०७ वा वर्धापन दिन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहर व परिसराची वाचन संस्कृती जोपासणारे, केंद्र शासनाचा राज- ाराम मोहन रॉय पुरस्कार प्राप्त श्री माणकेश्वर वाचनालयाचा १०७ वा वर्धापन दिन दि. ९ जुलै रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, सहचिटणीस राहुल दवते यांनी दिली.

यावेळी ९ जुलै रोजी सकाळी नऊ वाजता श्री माणकेश्वर वाचनालयाच्या सभागृहात सत्यनारायण महापूजा वाचनालयाचे स्वि.



कै. नानासाहेब गाडगीळ  कै. भाऊसाहेब उगांवकर  कै. विष्णुपंत सोनवणी

संचालक श्याम गोळे व सौ. सोनाली गोळे यांच्या हस्ते करण्यात येणार असून यानंतर वाचालयाचे संस्थापक कै. नानास- ाहेब गाडगीळ,कै. भाऊसाहेब उगावकर,कै. विष्णुपंत सोनवणी यांच्या प्रतिमेचे पूजन निफाड नगरपंचायतीचे नगरसेवक साहेबराव बर्डे, नगरसेवक बंटी उर्फ संदीप शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार,उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम, सहचिटणीस राहुल दवते, हिशोब तपासणीस,पक्षीमित्र दत्तात्रय उगावकर, संचालक तनवीर राजे, सुहास सुरळीकर,ग्रंथमित्र नईमखान पठाण, राजेंद्र खालकर,सुनील चिखले,बाळासाहेब कर्डिले, डॉ. महेश बनकर,संचालिका सुजाता तनपुरे, स्वीकृत संचालक गुलाब टकले, डॉ.अरुण कातकाडे, शामराव गोळे, ग्रंथपाल नितीन बनसोडे यांसह सभासद उपस्थित राहणार आहे.

# अतिक्रमण कारवाईला विरोध नाही, गरिबांची संसार उद्ध्वस्त करणे अन्यायकारक : मनसे नेते दिलीप धोत्रे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण आता मोहिमेला तीव्र नाराजी व्यक्त करत मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी प्रशासनाला गंभीर आरोप केले आहेत. अतिक्रमण हटवण्याला आमचा कोणताही विरोध नाही मात्र लहान व्यवसाय व फेरीवाले आणि कर्ज काढून उद्योग उभा केलेल्या गरिबांचे संसार उध्वस्त करण्याच्या अधिकार प्रशास- नाला नाही. असा संतप्त सवाल मनसेने ते दिलीप धोत्रे यांनी



पंढरपूर येथील मनसे कार्यालयात आयोजित पत्रकार परिषद केला.

याप्रसंगी यांनी पालिकेचे कायमस्वरूपी अतिक्रमण पथक असताना शहरात अतिक्रमण झालेत कशे? असाही सवाल उपस्थित करत कारवाईच्या पद्धतीवर कठोर शब्दात टीका केली यावेळी नगरसेवक संजय बंदपट्टे माजी नगरसेवक किरण राज घाडगे नगरसेवक लंकेश यादव नगरसेवक प्रसाद कळशी यांच्यासह मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी प्रशासनाची बैठक न घेता पर्यायी जागेचा विचार करत आणि संबंधितांना संधी देता हुकूमशाही पद्धतीने कारवाई केल्याचा आरोप.

# पंढरपुरात जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाचा शासनाकडे प्रस्ताव : अतुल कुलकर्णी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून प्रास्तावित श्री विठ्ठल कॉरिडोर मुळे, भविष्यात भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. या पार्श्वभूमी शहरात कायमस्वरूपी अतिरिक्त पोलीस यंत्रणा उभारण्यासाठी अतिरिक्त पो- लीस जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, विविध शाखा सह समोर एक पंधरा ते वीस पो- लीस अधिकारी २३० कर्मचारी नियुक्त करण्याचा प्रस्ताव शासनाच्या गृह विभागाकडे



पाठवण्यात आली असल्याची माहिती जिल्हा पोलीस अध- ीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिली.

पंढरपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते. त्यांनी सांगितले की विठ्ठल कोरिडॉर च्या उभारणीनंतर भाविकांची संख्या वाढणार असल्याने सुरक्षा व्यवस्था अतिशय सक्षम करणे आवश्यक आहे. त्यासाठी अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक कारल्या सोबत वाहतूक शाखा आर्थिक गुन्हे शाखा, महिला विभाग शाखा आदी विभाग सुरू करण्याचा, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याची ही त्यांनी सांगितले.

आषाढी यात्रेदरम्यान भाविकांना सुरक्षा आणि सुविधांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार असून अतिरिक्त पोलीस अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती व पंढरपूर शहरातील सर्व सर्व सुरक्षा व्यवस्था बळकट करण्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**अतिक्रमणास विरोध केल्यास कारवाई, पंढरपुरातील अतिक्रम णामुळे भाविकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापन कायदा अंतर्गत अतिक्रमण हटवण्यासाठी मोहीम सुरू करण्यात आली आहे. या कारवाईत कोणतेही राजकीय नेत्यांना व्यक्तीने अडथळा आणल्यास संबंधितावर कारवाई करण्यात येईल असा इशारा जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिला.**

**दि ०६ जुलै पासून प्लॉट नोंदणी सुरू: ६६८ प्लॉट्स उपलब्धता**

# आषाढी यात्रा सोहळा; पालखी सोहळा, दिंडीधारकांनी प्लॉटसची मागणी नोंदवावी : प्रांताधिकारी सचिन इथापे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. २५ जुलै २०२६ रोजी साजरा होत असून, यात्रा कालावधी १५ ते २९ जुलै २०२६ असा आहे. या यात्रेत येणाऱ्या दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत आहेत. दि.०६ जुलै पासून प्लॉट नोंदणी सुरु करण्यात येणार आहे. संबधितांनी भक्तीसागर येथे प्लॉटची मागणी नोंदवावी, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.

आषाढी यात्रेला येणाऱ्या पालखी सोहळ्या सोबत येणाऱ्या दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (६५ एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत




पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. त्यामुळे या ठिकाणी भाविकांची प्रचंड गर्दी होते. या ठिकाणी एकूण ६६८ प्लॉट्स भाविकांना निवाऱ्यासाठी दिले जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते. येथे प्रशासकीय यंत्रणा सुसज्ज व सुरळीतपणे काम करण्यासाठी तहसीलदार सचिन मुळीक यांची सेक्टर मॅनेजर म्हणून नियुक्ती केली आहे.भाविकांना प्लॉटस वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी कार्यान्वित असणार आहेत.

दिंडी, पालखी सोहळ्यासमवेत येणाऱ्या भाविकांना भक्तीसागर ६५ एकर येथे प्लॉटसचे वाटप करण्यात येणार आहे. आषाढी एकदशीच्या सोहळ्या अगोदर दिंडी, पालखीतील भाविकांने प्लॉटसाठी मागणी करणे आवश्यक आहे. या ठिकाणी भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार असून आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार सुधाकर धाईंजे (मो.क्र.९७६७२४८२१०), तसेच ग्राम म हसूल अधिकारी दादासाहेब पाटोळे (म ो.क्र.९९७०१०९९१९), प्रमोद खंडागळे (मो.क्र. ९६५७२९०४०३) तसेच वैभव कट्टे (मो.क्र.९६६५०७६०६६) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशास- नातर्फे करण्यात आले आहे.

# रामनगर ट्रान्झिट कॅम्प येथे वडाचे विशाल झाड कोसळले; सुदैवाने जीवितहानी टळली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर, (केतन भोज):सतत सुरू असलेल्या पावसामुळे घाटकोपर (पश्चिम) येथील रामनगर अ ट्रान्झिट कॅम्प परिसरात रविवारी वडाचे मोठे झाड अचानक कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा कोणाला गंभीर दुखापत झाली नाही. रामनगर ’अ’ हा परिसर मुख्य रहदारीचा मार्ग असल्याने या मार्गावर नेहमीच नागरिक आणि वाहनांची मोठी वर्दळ असते.झाड कोसळण्याच्या वेळी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती.म ात्र,सुदैवाने कोणतीही अप्रिय घटना घडली नाही. घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते प्रशांत मुके आणि करण इंगवले यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली.तसेच त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ’एन’ विभागाला घटनेची माहिती देत झाड हटविण्यासाठी त्वरित कारवाई करण्याची म ागणी केली.या घटनेमुळे परिसरातील रहदारी व वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर धोकादायक स्थितीत असलेल्या झाडांची तातडीने पाहणी करून आवश्यक ती उपाययोजना करावी,अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.



# राज्य सहकारी संघाचा शिक्षण निधी पुन्हा सुरू करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ''महाराष्ट्र राज्य सहकारी संघाला १०७ वर्षांची उज्ज्वल परंपरा आहे. सहकार क्षेत्रात प्रशिक्षित कार्यकर्ते निर्माण होण्यासाठी पूर्वी मिळणारा शिक्षण निधी अत्यंत आवश्यक होता, जो मध्यंतरी बंद झाला. हा शिक्षण निधी पुन्हा सुरू करण्याबाबत येत्या महिन्याभरात सकारात्मक निर्णय घेतला जाईल,'' असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिले आहे. आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त आयोजित 'सहकार गौरव पुरस्कार सोहळ्या'त ते बोलत होते.




नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे महाराष्ट्र राज्य सहकारी संघ आणि 'सहकारी महाराष्ट्र' यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, संघाचे अध्यक्ष आणि भाजप गटनेते आमदार प्रवीण दरेकर, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, सहकार व गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर यांच्यासह सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, ''सहकार क्षेत्राचे मर्म महाराष्ट्राने १२५ वर्षांपूर्वीच जाणले होते. देशातील पहिली ग्रामीण सहकार पेढी १९०४ मध्ये कोकणातील कणकवली येथे सुरू झाली. त्यानंतर संपूर्ण भारतात ही चळवळ विस्तारली, परंतु सर्वाधिक मजबुतीने सहकार महाराष्ट्रातच रुजला. आज राज्यात २ लाखांपेक्षा जास्त वेगवेगळ्या सहकारी संस्था कार्यरत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ६ जुलै २०२१ रोजी पहिल्यांदा सहकारी चळवळीची ताकद ओळखून स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन केले. सहकाराचा मोठा अनुभव असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली आता राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर झाले असून, पुढील २० वर्षांत जीडीपीमधील सहकाराचा हिस्सा ३ पटीने वाढवण्याचा संकल्प करण्यात आला आहे.''

**स्वयंपुनर्विकासाच्या माध्यमातून मुंबईत मराठी माणसाचे स्वप्न पूर्ण :**

फडणवीस म्हणाले, ''महाराष्ट्रातील एकूण सोसायट्यांमध्ये ४० ते ४५ टक्के सोसायट्या गृहनिर्माण क्षेत्रातील आहेत. पूर्वी हा घटक उपेक्षित होता, परंतु आपण सहकार कायद्यात त्यांच्यासाठी स्वतंत्र प्रकरण (चॅप्टर) समाविष्ट करून त्यांचे अधिकार निश्चित केले. प्रवीण दरेकर समितीच्या अहवालानुसार आणलेल्या स्वयंपुनर्विकास योजनेमुळे आज ४०० चौरस फुटांच्या घरात राहणारा सामान्य माणूस १ हजार चौरस फुटांच्या घरात जात असून मुंबईतील मराठी माणसाचे हक्काच्या मोठ्या घराचे स्वप्न पूर्ण होत आहे. मुंबईबाहेर 'युडीसीपीआर'मुळे स्वयंपुनर्विकासात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी चालू अधिवेशन संपल्यानंतर विशेष बैठक घेऊन आवश्यक ते बदल केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**'मुंबईप्रमाणेच पुणे, ठाणे, नाशिकमध्येही स्वयंपुनर्विकास लागू करा' :**

तत्पूर्वी, प्रास्ताविक मांडताना महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी संघाला उर्जितावस्था आणण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. ''स्वयंपुनर्विकास योजनेचा जीआर सध्या मुंबई पुरता मर्यादित आहे. डीसीपीआरमध्ये छोटासा बदल केल्यास पुणे, ठाणे, नाशिक या महापालिका क्षेत्रातील सहकारी सोसायट्यांचाही स्वयंपुनर्विकास सुकर होईल. या प्रक्रियेसाठी सुमारे २५ हजार कोटी रुपयांच्या निधीची गरज असून, राज्य सहकारी संघाचा बंद झालेला शिक्षणनिधी आणि अनुदान पुन्हा सुरू करावे,'' अशी मागणी दरेकर यांनी केली.

**सहकार क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव :**

पुरस्कार वितरण सोहळ्यात सहकार क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासकीय अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांना 'सहकार महर्षी पुरस्कार', वारणा सहकार समूहाचे अध्यक्ष आमदार विनय कोरे यांना 'सहकार भूषण पुरस्कार', भगिनी निवेदिता सहकारी बँकेच्या (पुणे) अध्यक्षा डॉ. रेवती पैठणकर यांना 'सहकार रत्न पुरस्कार', महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिपक पटवर्धन यांना 'सहकार गौरव पुरस्कार', अण्णासाहेब सावंत नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई सावंत यांना 'महिला सहकार शक्ती पुरस्कार' तसेच सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेते शिवाजीराव नलावडे यांना 'सहकार विभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

---

# चैतन्य दिनदर्शिकेचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्या हस्ते प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : चैतन्य प्रतिष्ठान गोवा यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या चैतन्य दिनदर्शिकेचे प्रकाशन राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्या हस्ते करण्यात आले या दिनदर्शिकेत तारखा, पक्ष, तिथी आणि सणांची विस्तृत व तपशीलवार माहिती देण्यात आली असल्याचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी सांगितले.




यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, समितीचे सदस्य शकुंतला नडगीरे, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, तहसीलदार सचिन लंगुटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर म्हणाले, पारंपारिक पद्धतीने व हिंदूच्या प्रथा परंपरेची माहिती मिळवण्यासाठी दिनदर्शिका महत्त्वाची आहे. कालगणना ही चैत्रापासून सुरू होते चैत्र प्रतिपदेला सुरू होते. ज्याला आपण गुढीपाडवा म्हणतो हे नवीन वर्ष सुरू होतं ते देशाच्या अनेक भागात सुरू होत असते. आपल्याला चैत्र महिना आठवत नाही आपल्याला जानेवारी माहीत असतो आपल्याला वैशाख माहीत नसतो पण आपल्याला फेब्रुवारी पूर्णपणे माहीत असतो ही आजची अवस्था आहे पारंपारिक पद्धतीने आपल्याला ही माहिती मिळणे गरजेचे आहे. कालगणना ज्यावेळी पृथ्वीची उत्पत्ती झाली त्यावेळी पासूनही सुरू झाली म्हणून पृथ्वीचा उत्पत्ती दिवस चैत्र प्रतिपदेला आहे तो दिवस अर्थ डे म्हणून साजरा केला जातो. चैत्र प्रतिपदा हीच पृथ्वीची उत्पत्ती दिवस आहे उत्पत्तीची तिथी आहे आणि तेही शास्त्रोक्त आहे . कालगणना सर्व देशात पोचली पाहिजे. दिनदर्शिका ही दैनंदिन जीवनात उपयोगी असल्याचेही राज्यपाल यांनी यावेळी सांगितले

तसेच मंदिर जतन व संवर्धनाचे काम चांगल्या पद्धतीने झाले असून, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर काही दिवसात पुनर्वैभव घेऊन उभा राहणार आहे असे सांगून अहंकाराचा वारा आम्हा सर्वांना लागू देऊ नको हीच विठ्ठला चरणी प्रार्थना केली असल्याचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज म्हणाले चैतन्य दिनदर्शिकेत पारंपारिक पद्धतीने माहिती दिली असून यामध्ये तिथी, वार, चरण, करण, योग, नक्षत्र आदीबाबत माहिती देण्यात आली आहे. ही माहिती दैनंदिन जीवनात उपयोगी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांनी आभार प्रदर्शन व्यक्त केले.

# मुक्ताबाई हॉस्पिटल-खंडोबा मंदिर मार्गावर दरडसदृश्य परिस्थिती; तातडीच्या उपाययोजनांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे घाटकोपर (पश्चिम) येथील मुक्ताबाई हॉस्पिटल मार्गावरून खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यालगतच्या डोंगराची मोठ्या प्रमाणात माती ढासळत आहे.त्यामुळे या परिसरात दरडसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.रस्त्यालगत असलेल्या डोंगरावरून मातीचा मोठा भाग कोसळण्याच्या स्थितीत असल्याने या मार्गाने ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.पावसाचा जोर कायम राहिल्यास माती दरडसदृश्य भाग घसरण्याची शक्यता असल्याने मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.स्थानिक नागरिकांनी संबंधित प्रशासनाकडे तातडीने घटनास्थळी पाहणी करून धोकादायक भाग सुरक्षित करून संरक्षणात्मक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.तसेच भविष्यात कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी,अशी ही मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.



---

# टीईटी पेपरफुटी प्रकरणात अटकेची मालिका सुरू; आरोपींची संख्या दहावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : टीईटी पेपर फुटी प्रकरणात आणखी तीन आरोपींना अटक करण्यात पोलीस यंत्रणेला यश आले आहे. शनिवारी या तीनही आरोपींना भिवंडी न्यायालयात न्या.एस एम सुतार यांच्या न्यायालयात हजर केले असता या तीनही आरोपींना ९ जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. संजयकुमार सुरेशचंद्र शर्मा,वय ४४, बाबुलाल नारायणसिंह कुशवाह, वय ४५, नरेशकुमार पुरनचंद माहौर उर्फ निकी, वय ३५ वर्ष अशी अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींची नावे असून या तीनही आरोपींना आग्रा येथील प्रिंटिंग प्रेस मधून पोलिसांनी अटक केली आहे.या तिघांचा टीईटी पेपर फुफी प्रकरणात महत्वाचा सहभाग असून प्रिंटिंग प्रेस मधून प्रश्न पत्रिका पेपर बाहेर काढण्यात या तिघांचा सहभाग असल्याचे पोलीस तपासात समोर आले असून या प्रकारणात या तिघांनी काही आर्थिक व्यवहार केले आहेत का याबाबत पोलीस तपास करीत आहेत. याआधी या प्रकरणात सात आरोपींना अटक करण्यात आली असून आता या तीन आरोपींना अटक केल्यामुळे या टी ई टी पेपर फुटी प्रकरणातील एकूण आरोपींची संख्या दहावर पोहोचली आहे. आज अटक करण्यात आलेले तीनही आरोपी आग्रा येथील प्रिंटिंग प्रेस मध्ये काम करत असून मालक सांगतील ते काम करणे कामगारांना बंधनकारक असते,त्यामुळे या कामगारांचा टीईटी प्रकरणाशी आर्थिक अथवा इतर कुठलाही संबंध नसल्याची बाजू आम्ही माननीय न्यायालयासमोर मांडली असून न्यायालयाने आरोपींना ९ जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे अशी प्रतिक्रिया आरोपींचे वकील ॲड.शैलेश गायकवाड यांनी दिली आहे.



# कळंब येथे बच्चूभाऊ कडू यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा विधानपरिषदेचे आमदार मा. ओमप्रकाश ऊर्फ बच्चूभाऊ कडू यांचा वाढदिवस यंदा प्रहार संघटना, कळंब यांच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

संत ज्ञानेश्वर मूकबधिर विद्यालय, कळंब येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये पेन, पेन्सिल, वह्या देण्यात आल्या. त्याचबरोबर केळी,

**मूकबधिर विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप**

बिस्किट, कुरकुरे आणि सोनपापडीचे वाटप करून मुलांसोबत वाढदिवसाचा आनंद साजरा करण्यात आला.



हा उपक्रम प्रहार संघटनेचे कळंब तालुका अध्यक्ष गणेश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उत्साहात पार पडला.

यावेळी संतोष लांडगे, नौशाद भाई शेख, तात्या शिंदे, कैलास यादव, इरफान बागवान, आकाश शेळवणे, बांगर सर, करंजकर, महेश घोगरे, बागवान, नागनाथ खरबडे, धनंजय पारेकर, ललित कापरे, लखन आळणे, सुनील बोंदार्डे यांच्यासह प्रहार संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या सामाजिक कार्याच्या प्रेरणेतूनच हा उपक्रम राबविण्यात आल्याचे यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

---

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सेमी इंग्लिश चालू करण्यासाठी हालचालींना वेग**

# नळदुर्ग येथील जि. प. स्पेशल शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी मदत करणार : सभापती सिध्देश्वर कोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग : नळदुर्ग येथील भीमनगर परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक स्पेशल शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्यात येईल. शाळेच्या कोणत्याही विकासकामात निधी किंवा सहकार्याची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती सिद्धेश्वर कोरे यांनी केले.

नळदुर्ग येथील जिल्हा परिषद प्राथमिक स्पेशल शाळेत आयोजित सत्कार समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी नळदुर्ग नगर परिषदेचे गटनेते मारुती खारवे व नगरसेविका साक्षी नळदुर्गकर यांचा ही शाळेच्या वतीने शाल, भारतीय संविधानाचा ग्रंथ आणि वृक्ष देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना सिद्धेश्वर कोरे म्हणाले की, शिक्षणामुळे व्यक्तीला स्वतःची ओळख मिळते, आत्मविश्वास वाढतो आणि समाजात सन्मानाने जगण्याची प्रेरणा मिळते. शिक्षणामुळे वाईट व्यसनांपासून दूर राहून प्रगल्भ विचारसरणी विकसित होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक उपक्रमांची जोड ही तितकीच आवश्यक आहे. जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी विविध योजना राबविल्या जात असून विद्यार्थ्यांना गणवेश, पुस्तके आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. अधिकाधिक पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश जिल्हा परिषद शाळांमध्ये करून दर्जेदार शिक्षणाचा लाभ घ्यावा, कारण जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये सेमी इंग्लिश विषयाला अनुसरून लवकरच वर्ग चालू होतील जेणेकरून विद्यार्थ्यांच्या अभ्यासामध्ये इंग्रजी परखड होईल असे प्रतिपादन कोरे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या सहशिक्षिका सुलक्षणा टिळक यांनी केले

शाळेच्या जीर्ण झालेल्या इमारतीची दुरुस्ती, मूलभूत सुविधा आणि इतर समस्यांविषयी सहशिक्षिका सुलक्षणा टिळक यांनी सांगितले



यावेळी यावेळी माजी नगरसेवक किशोर बनसोडे पत्रकार तथा संपादक दादासाहेब बनसोडे , शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा पल्लवी बनसोडे , उपाध्यक्ष सुजाता कांबळे, सदस्य उषा कांबळे , सहशिक्षिका मदतनीस प्रेरणा सुरवसे , पोषण आहार मदतनीस खुशाल बनसोडे सह अनेक नागरीक व पालक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते

नळदुर्ग शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व शैक्षणिक विकासासाठी उपलब्ध विविध कामांसाठी निधी मिळतो तो निधी पाठपुरावा करून मदत देण्याचे आश्वासन दिले शेवटी आभार शाळेचे मुख्याध्यापक यूएस शेख यांनी मानले

# साखर खेर्डा भाजपा युवा मोर्चा मंडळ अध्यक्षपदी संदिप वाघ यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील साखर खेर्डा मंडळ सर्वात मोठे असून त्यात पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी भारतीय जनता पक्षाला.संघटन मजबूत करण्यासाठी युवा चेहरा मिळाला आहे. संदिप वाघ दरेगाव पंचायत समिती गण असलेल्या दरेगाव नागझरी गट ग्रामपंचायत चे सलग दुसऱ्यांदा ग्रामपंचायत सदस्य विद्यमान उपसरपंच आहेत. भाजपा युवा मोर्चा ची तालुका उपाध्यक्ष ची जबाबदारी स्वीकारली असतांना पक्ष संघटन मजबूत.व युवा वर्ग त्यांच्या सोबत असताना दिसत आहे.भारतीय जनता पक्षात संघटन मजबूत करण्यासाठी तालुका स्तरावर मंडळ अध्यक्षांची निवड करण्यात येत आहे. युवा चेहरा असलेले संदिप वाघ यांची निवड भाजपा पार्टी चे साखर खेर्डा मंडळ अध्यक्ष शिवाजी अशोक वाघ यांनी केली असता संदिप वाघ यांना नियुक्ती पत्र देताना उपस्थित भाजपा नेते अंकुर देशपांडे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले संदिप वाघ यांचे सर्व स्तरावरुन अभिनंदन केल्या जात आहे.

